# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building, 4th Floor, St. George's Hospital Compound, Near CST, Mumbai - 400 001.
Tel. No. +91-22-22620363-65 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22- 22652168 / 22620562 Website: http://www.dmer.org


क्र.संवैशिवसं/एमएचटी-सीईटी २०१०/निकाल/प्रेस नोट/१-अ, दि.:१४/६/२०१०

# प्रेस नोट

# एमएचटी-सीईटी २०१०

महाराष्ट्र शासनामार्फत आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या तीनही व्यावसाईक अभ्यासक्रमांसाठी एकच सामाईक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी-२०१०) गुरुवार, दिनांक ०६ मे, २०१० रोजी घेण्यात आली होती.

एमएचटी-सीईटी-२०१० प्रवेश परीक्षेचा निकाल **सोमवार, दिनांक १४ जून, २०१० रोजी सकाळी १०.०० वाजता** जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रिका त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत प्राप्त होतील. तसेच सदरचा निकाल संचालनालयाच्या **"www.dmer.org"** या संकेतस्थळावर विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदर प्रवेश परीक्षा राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्यावतीने महसूल, शिक्षण, वित्त व गृह विभागाच्या सहकार्याने पार पाडण्यात आली.

सामाईक प्रवेश परीक्षा-२०१० सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एकूण **७४० केंद्रावर** घेण्यात आली. प्रवेश परीक्षेला एकूण २८२०९६ उमेदवार उपस्थित होते.

त्यापैकी आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **१७६६३२** त्यामध्ये मुलांची संख्या ९९४२३ (५६.२९%) व मुलींची संख्या ७७२०९ (४३.७१%) एवढी आहे.

राज्यातून आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी वैधानिक विकास मंडळ निहाय, परीक्षेस बसलेल्या व त्यापैकी वैद्यकीय, दंत अभ्यासक्रमासाठी तीनही विभागातील पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| विभाग | बसलेले उमेदवार | पात्र उमेदवार | टक्केवारी |
|---|---|---|---|
| उर्वरित महाराष्ट्र | १०६९५३ | १६४८९ | १५.४२% |
| विदर्भ | ३७६५८ | ५७२८ | १५.२१% |
| मराठवाडा | ३२०२१ | ४६८८ | १४.६४% |

सदर प्रवेश परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार **आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जुन महिन्याच्या शेवटच्या आठवडयात विद्यार्थ्यांकडून प्रेफरन्स फॉर्म भरुन घेण्याची प्रक्रिया महाराष्ट्रातील ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद या ४ विभागीय प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.** याबाबतचे नोटीफिकेशन वृत्तपत्रातून व संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन जाहिर करण्यात येईल. तसेच अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची पुढील प्रक्रिया तंत्रशिक्षण शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणार आहे. तर पुशवैद्यकीय व मत्स्योत्पादन या अभ्यासक्रमाचे प्रवेश रजिस्ट्रार, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेमार्फत करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने प्रवेश प्रक्रियेची माहिती संबंधित कार्यालयांमार्फत जारी करण्यात येईल.

एमएचटी-सीईटी २०१० च्या प्रवेश परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याकरीता महसूल, शिक्षण, वित्त व गृह विभागांनी सहकार्य दिले त्याबद्दल सक्षम प्राधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई त्यांचे आभारी आहेत. तसेच विद्यार्थी आणि पालक यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल शासनाच्या वतीने त्यांना धन्यवाद देण्यात येत आहेत. प्रवेश परीक्षेच्या विविध टप्प्याना विस्तृत प्रसिध्दी देण्यात वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया यांनी महत्वाची भूमिका बजाविली त्याबद्दल शासन त्यांचे आभारी आहे.

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी व संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**